# ग्राहक गाऱ्हणे निवारण मंच

(विद्युत कायदा ,२००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित )

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### जळगाव परिमंडळ


दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४
Email :-cgrfjalgaonzone@gmail.com
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जुनी एम.आय.डी.सी.
महावितरण विश्राम गृहाजवळ,
अजिंठा चौफुली जळगाव. ४२५००३


जा.क्र: स.स./ग्रागानिमं/जप/जळगाव मं/१४–२०१८–१९/ 000010 दिनांक: 20 FEB 2019

(रजिष्टर पोच व्दारे)

गाऱ्हाणे दाखल दिनांक : १८/१२/२०१८
निकाल दिनांक 16 FEB 2019

प्रति,

१. श्री चंद्रशेखर बळीराम बोंडे,
प्लॉट नं. १७,दिक्षितवाडी ,जळगाव,
ता.जि.जळगाव. पिन-४२५००१
(ग्रा.क्र.११००१९९९२१८७) } तक्रारदार

२. नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
मंडळ कार्यालय जळगाव

३. कार्यकारी अभियंता
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
विभागिय कार्यालय, जळगाव. } विज वितरण कंपनी

सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., जळगाव, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

## निर्णयपत्र

श्री चंद्रशेखर बळीराम बोंडे, प्लॉट नं. १७,दिक्षितवाडी जळगाव,ता.जि.जळगाव.. हे विज वितरण कंपनीचे व्यावसयिक प्रवर्गातील ग्राहक आहेत. त्यांना महावितरण कंपनीकडुन करण्यात आलेला विद्युत पुरवठा ग्राहक वर्गवारी / दरसंकेत (Tarrife Change) वाणिज्य ऐवजी औद्योगिक असा करुन मिळणेबाबत व त्यानुसार आकारलेले दर कमी करुन मिळणे व अद्यापपावेतो जादाचे भरलेली रक्कम परत मिळणेबाबत योग्य ते आदेश पारीत करावेत व इतर अनुषंगिक न्यायोचित आदेश होण्याबाबत योग्य ती कार्यवाही होण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली. मात्र अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडुन दिलेला निकाल त्यांना मान्य नसल्यामुळे ग्राहकाने आपले गाऱ्हाणे अनुसुची "अ" मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे दि १८.१२.२०१८ रोजी नोंदविण्यात आले.

त्यानुसार मंचाचे अध्यक्ष ,सदस्य-सचिव व सदस्य यांनी आपसात सल्लामसलत करुन हे प्रकरण सुणावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर गाऱ्हाण्याची सुणावनी दि.११.०१.२०१९ रोजी घेण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दि.०२.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मंडळ कार्यालय जळगाव व कार्यकारी अभियंता विभागिय कार्यालय जळगाव यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसाच्या आत मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनीच्या जळगाव मंड्ळ कार्यालयाकडुन कार्यकारी अभियंता श्री शिवाजी भालशंकर, तसेच जळगाव विभाग कार्यालयाकडुन कार्यकारी अभियंता श्री संजय तडवी, हे उपस्थित होते. तर ग्राहक श्री सतिश सोमा काळे ग्राहक प्रतिनिधी श्री सचिन चोरडिया हे उपस्थित होते.

**ग्राहकाची बाजु :-**

On verification of our Bills we observed that we are being billed with Wrong Tariff. Our main business activity is of Digital Printing etc. and thus this is an Industrial activity as per Circular No.180 Dated 05-12-2012 i.e. Aug-2012. Hence vide our letter at reference one we made request to the Office of Executive Engineer, Jalgaon for correction of tariff. Our request was that we should be billed with Industrial tariff and excess amount that MSEDCL have recovered from us may please be refunded with Interest.




Scanned by CamScanner

As we did not get any response from this office we filed an appeal vide our letter at reference two with Internal Grievance Redressal Cell, Under Jalgaon Circle, MSEDCL to decide the matter for Correction of Tariff.

Internal Grievance Redressal Cell without giving any opportunity of Hearing informed to us vide their letter at reference three that our grievance cannot be admitted as cause of action arose in AUG 2012 and we have filed the appeal more than two year later. Hence our appeal not admitted.

In this reference we submit that since the wrong tariff is being applied since the beginning the cause of action is in continuance and it is only in AUG 2012. Though cause of action is in continuance, our case without hearing has been decided by IGRC.Hence we request your king authority that IGRC may please be directed Readmit our case and only after giving us the opportunity of hearing matter may be decided.

We may further be permitted to approach your kind authority if we are not satisfied with the decision of the IGRC or our case is not decided by IGRC within stipulated period and after giving us the hearing opportunity.

Submitted for suitable order please.

**रोजनाम्यानुसार १९-०१-२०१९ चा ग्राहक प्रतिनिधी यांचा अतिरीक्त खुलासा :-**

१. आम्ही वीज पुरवठा घेतल्याच्या दिनांकापासुन प्रिंटींगचा व्यवसाय करीत आहोत. महावितरणने माहे. ऑगस्ट -२०१२ पासुन प्रिंटींगला औद्योगिक म्हणुन मान्यता दिलेली आहे.

२. आमचा भागिदारी कंपनी असुन त्यामध्ये आम्ही प्रिंटींगचा व्यवसाय तसेच त्यासाठी लागणारे साहित्य विक्रीचा व्यवसाय सुद्धा करतो. त्यासाठी आम्ही वेगळे वीज पुरवठयाचे वाणिज्य कनेक्शन घेतलेले आहे. व प्रिंटींगसाठी वेगळे कनेक्शन आहे.

३. त्यामुळे आम्हाला आमची ग्राहक वर्गवारी माहे ऑगस्ट -२०१२ पासुन औद्योगिक करुन पुढील वीज देयकामध्ये वीज कायदा २००३ कलम ६२ (६) अन्वये देय असलेल्या व्याजासह वीजग्राहक वर्गवारीचा फ़रक समायोजित करुन मिळावा ही नम्र विनंती.

**वितरण कंपनीची बाजु :-**

वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता ,विभागिय कार्यालय जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.०२०९ दि.०८.०१.२०१९ अन्वये पत्रव्यवहार मंचापुढे सादर केला त्यात त्यांनी त्यांची बाजु खालील प्रमाणे मांडलेली आहे.

वरील संदर्भित विषयास अनुसरुण मी कार्यकारी अभियंता, जळगाव शवग्रा विभाग सदरील केस क्र. १४/२०१८-२०१९ श्री चंद्रशेखर बळीराम बोंडे, प्लॉट नं १७ दिक्षीतवाडी, जळगाव ग्रा.क्र. ११००१९९९२१८७ उपलब्ध दस्तएवजानुसार खालीलप्रमाणे खुलासा अवगत करीत आहे.

वरील ग्राहक श्री चंद्रशेखर बळीराम बोंडे यांनी विद्युत बिलाचा दरसंकेत बदल करण्याविषयी अर्ज दि.२०.०४.२०१८ रोजी केलेला आहे. ग्राहकाने दि.२०.०४.२०१८ ला अर्ज केल्यानंतर ग्राहकाच्या जागेचे स्थळ परिक्षण दि.०४.०७.२०१८ रोजी करण्यात आले व ग्राहकाचा वापर हा स्थळ परिक्षणानुसार "**प्रिंटीग प्रेस**" चा असल्याने ग्राहकास अर्ज केल्यानंतरच्या पुढील महिन्यापासुन (मे-२०१८) इंडस्ट्रीयल टेरिफ़ प्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे. म्हणजेच माहे एप्रील-२०१८ ते ऑगस्ट २०१८ या महिन्याची बिल दुरुस्ती करुन देण्यात आलेली आहे.

ग्राहकाचा पुर्वीचा दरसंकेत कमर्शियल होता वाणिज्य परिपत्रक क्र. १७५ नुसार "**प्रिंटीग प्रेस**" हा दरसंकेत लागु आहे. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८, संस्थेच्या नोंदणी दाखल्यानुसार ग्राहकाच्या धंदयाचे स्वरुप हे स्क्रिन प्रिंटींग,डिजीटल प्रिंटींग,रेडीयम साईन बोर्ड इ. वस्तुला लागणारे साहित्य खरेदी व विक्री असे वर्णन आहे. त्यामुळे सदर ठिकाणी केवळ उत्पादन होत नसुन खरेदी विक्री तसेच इतर वाणिज्य कामेही होतात. म्हणजेच विजपुरवठा घेतेवेळी ग्राहकाचा विजवापर हा व्यावसायिक स्वरुपाचा असल्याने ग्राहकास कनेक्शन दिल्याबरोबर ग्राहकास टॅरिफ़ कोड "**कमर्शियल**" प्रमाणे बिलींग करण्यात आले.

ग्राहकाने भा.वि.कायदा -२००३ मधील कलम ५६ (२) नुसार सदर ग्राहकाने अर्ज केल्यापासुन मागील दोन वर्षापर्यंत दरसंकेत बदल मागितला आहे. वरील कारणास्तव ग्राहकाचा मागील दोन वर्षाचा टॅरिफ़ बदल करता येणार नाही.

सदर केस बाबतीत बील रिव्हीजन ची हार्ड कॉपी ही प्रादेशिक कार्यालयात असल्याने अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. ग्राहकाच्या सध्याचा बिलावरील दरसंकेत हा इंडस्ट्रीयल आहे. ग्राहकाच्या सध्याचा बिलावरील दरसंकेत हा एल.टी.१० (इंडस्ट्रीयल) असा आहे. सदरील खुलासा दिला आहे.



Scanned by CamScanner

**रोजनाम्यात नमुद केल्याप्रमाणे महावितरणचे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी त्यांचा अतिरीक्त खुलासा पत्र क्र.०३३६ दि.१८.०१.२०१९ अन्वये सादर केला आहे सदर अतिरीक्त खुलासा खालील प्रमाणे :-**

वरील संदर्भित विषयास अनुसरुण मी कार्यकारी अभियंता, जळगाव शवग्रा विभाग सदरील केस क्र. १४/२०१८-२०१९ श्री चंद्रशेखर बळीराम बोंडे, प्लॉट नं १७ दिक्षीतवाडी, जळगाव ग्रा. क्र. ११००१९९९२१८७ उपलब्ध दस्तएवजानुसार खालीलप्रमाणे खुलासा अवगत करीत आहे.

याबाबतीत महावितरणकडे संबंधीत ग्राहकाने मागणी केल्यानुसार व उपलब्ध करुन दिलेल्या दस्तएवजानुसार सदरील ग्राहकास दि.१८.०७.२०१० रोजी कमर्शियल दरसंकेतानुसार विद्युत पुरवठा देण्यात आला आणि तो त्यांना दि.२०.०४.२०१८ पर्यंत मान्य होता.

वरील ग्राहक श्री चंद्रशेखर बळीराम बोंडे यांनी विद्युत बिलाचा दरसंकेत बदल करण्याविषयी अर्ज दि.२०.०४.२०१८ रोजी केलेला आहे. ग्राहकाने दि.२०.०४.२०१८ ला अर्ज केल्यानंतर ग्राहकाच्या जागेचे स्थळ परिक्षण दि.०४.०७.२०१८ रोजी करण्यात आले व ग्राहकाचा वापर हा स्थळ परिक्षणानुसार "**प्रिंटीग प्रेस**" चा असल्याने ग्राहकास अर्ज केल्यानंतरच्या पुढील महिन्यापासुन (मे-२०१८) इंडस्ट्रीयल टेरिफ़ प्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे. म्हणजेच माहे एप्रील-२०१८ ते ऑगस्ट २०१८ या महिन्याची बिल दुरुस्ती करुन देण्यात आलेली आहे.

महावितरण वाणिज्य परिपत्रक क्र.१८० दि.०५.१२.२०१२ नुसार , सर्व उपविभागिय अधिकारी यांनी प्रिंटींग प्रेसचा वापर पाहुन त्यांचा दरसंकेत कमर्शियल एवजी औद्योगिक करावा असे निर्देश दिलेत. परंतु वरील परिपत्रक प्रसिध्दी वेळी जळगाव विभागात मे.सी.जी.एल कंपनी ही माहे नोव्हेंबर -२०११ ते ऑगस्ट-२०१५ मध्ये कार्यरत होते. त्यामुळे सदरील ग्राहकाचे स्थळ परिक्षण अथवा दरसंकेत बदलाची मागणी दस्तएवज नाहीत. अथवा ग्राहकांकडे देखील सदरील दस्तएवज पोहच नाही.

मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८, संस्थेच्या नोंदणी दाखल्यानुसार ग्राहकाच्या धंदयाचे स्वरुप हे स्क्रिन प्रिंटींग,डिजीटल प्रिंटींग,रेडीयम साईन बोर्ड इ. वस्तुला लागणारे साहित्य खरेदी व विक्री असे वर्णन आहे. त्यामुळे सदर ठिकाणी केवळ उत्पादन होत नसुन खरेदी विक्री तसेच इतर वाणिज्य कामेही होतात. म्हणजेच विजपुरवठा घेतेवेळी ग्राहकाचा विजवापर हा व्यावसायिक स्वरुपाचा असल्याने ग्राहकास कनेक्शन दिल्याबरोबर ग्राहकास टॅरिफ़ कोड "**कमर्शियल**" प्रमाणे बिलींग करण्यात आले.

करीता दि.२०.०४.२०१८ रोजी ग्राहकाने दरसंकेत बदल करणे विषय अर्ज केल्याने त्यांचे स्थळ परिक्षण नुसार मे-२०१८ पासुन दरसंकेत बदल केलेले आहेत. ग्राहकाच्या सध्याचा बिलावरील दरसंकेत हा एल.टी. १० (इंडस्ट्रीयल) असा आहे, सदरील खुलासा दिला असे.

**अंतर्गत तक्रार निवारण कक्षाची कार्यवाही :-**

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडळ कार्यालय, जळगाव यांनी सदर केस बाबतीत सुनावणी न घेता पत्र क्र.७१३८ दि.०४.१२.२०१८ अन्वये ग्राहकास खालील प्रमाणे कळविण्यात आले :-

*"we acknowledged the receipt of your Grievance Internal Grievance Redressal Cell (IGRC) , Jalgaon on 27th August 2018 and submit in reference to the captioned matter that the cause of action of your Grievance arose on Aug-2012. You were supposed to file your Grievance within 2 Years from the date of cause of action but you have field instant Grievance after 6 years without assingning any justifiable reason for the delay caused, threrfore your Grievance can not be admitted in view of Rule 6.6 of Maharashtra Electricity Regulatory commission (Consumer Grievance Redressal Forum & Electricity Ombudsman) Regulation, **2006**"*

**मंचाचे निष्कर्ष :-**

तक्रारदाची तक्रार, दाखल कागदपत्रे विजवितरण कंपनीचे म्हणने व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की,

१. वरील ग्राहकाचे मे.सिध्द ग्राफिक्स यांचे कनेक्शन २०१० पासुन असुन ग्राहकाने त्यावेळी शॉप ॲक्ट लायसन्स परवाना व SSI Registration कनेक्शन घेतेवेळी सादर केलेले दिसतात.
२. Comm.Circuler No.-१८० दि.०५/१२/२०१२ ला निर्गमित झाले असुन त्याप्रमाणे महावितरणने वरील ग्राहकास स्वत:हुन (Sumotto) सुधारित वीजदेयक देणे अपेक्षीत होते.
३. सदर प्रकरणी ग्राहकाकडुन कुठलाही अर्ज अपेक्षित नसल्याने २ वर्षाची मर्यादा लावता येणार नाही. म्हणुन ग्राहकास वाणिज्य परिपत्रक १८० अन्वये परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे व नमुद केलेल्या तारखेपासुन औद्योगिक दरसंकेताप्रमाणे विजबिल देण्यात यावे.

ग्राहकाचे प्रतिनिवेदन, विद्युत वितरण कंपनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करुन मंच या प्रकरणी खालील निर्णय देत आहे.



Scanned by CamScanner

## निर्णय

१. वरीलप्रमाणे ग्राहकास वाणिज्य परिपत्रक १८० अन्वये परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे व नमुद केलेल्या तारखेपासुन औद्योगिक दरसंकेताप्रमाणे विजबिल देण्यात यावे.
२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम क्र.६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाची पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निष्कर्ष यावरील कार्यवाहीचा अहवाल मंचाकडे एक महिन्यात सादर करावा.
३. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अंमलबजावणी न केल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम क्र.२२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागु शकतात.
४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र.१७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे, (द्वारा-महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ केशवा बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई-४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासुन ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

| | | |
|---|---|---|
| सही | सही | सही |
| **(ॲड.चंद्रकांत मोहन येशीराव)** | **(विजयानंद संपतराव काळे)** | **(डॉ.भास्कर गोविंदा पालवे.)** |
| **सदस्य** | **सदस्य-सचिव तथा कार्यकारी अभियंता.** | **अध्यक्ष** |

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित :-**

१. मुख्य अभियंता,म.रा.वि.वि.कं.(मर्या), विद्युत भवन, परिमंड्ळ कार्यालय, जळगाव.
२. अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.(मर्या)मंडळ कार्यालय,जळगाव.

सदस्य-सचिव / कार्यकारी अभियंता
म.रा.विज वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जळगांव परीमंडळ,जळगांव



Scanned by CamScanner